
• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८३ • शुक्रवार, दि. १२ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 283 • Friday 12 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3



राजमाता जिजाऊ
यांना जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे
वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे
9146702323
8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड, बीड

# शिवसेना शिंदे गटाचे अस्तित्व भाजपच संपवणार!

**मुंबई । वृत्तसंस्था**

आमदार अपात्रता प्रकरणामध्ये महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष नार्वेकर यांनी दिलेल्या निकालामुळे महाराष्ट्राचं राजकारण ढवळून निघालं आहे. नार्वेकर यांनी एकनाथ शिंदेंचीशिवसेना हीच खरी शिवसेना असल्याचा निकाल दिला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे. ठाकरे गटाकडून या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात येणार आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा अध्यक्षांच्या निकालामधून कुठलाही पक्ष हा खासगी मालमत्ता होऊ शकत नाही, हे अधोरेखित झाले आहे, अशी प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे आता नार्वेकर यांच्या निकालामुळे राज्यातील राजकीय परिस्थितीत काही बदल होणार आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. २०१४ नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या प्रमाणात उलथापालथी घडल्या आहेत. त्यामुळे नार्वेकर यांनी दिलेल्या निकालामुळे आणखी काही आमुलाग्र परिवर्तन होईल, असं नाही. खरंतर शिवसेना ज्या कारणामुळे तुटली आहे. त्याचं कारण मागच्या दशकभरातील भाजपाच्या विस्तारवादी धोरणात आहे. मुंबई-ठाणे आणि कोकणपट्ट्याबाबेर शिवसेनेपासून भ्रमनिरास झालेल्या मतदारांना आपल्याकडे खेचले आहे. मुंबई-पुणे -नाशिक आदी शहरी भागांसह विदर्भ मराठवाड्यामधील शिवसेनेच्या मतदारालाही आपल्याकडे वळवण्यात भाजपा यशस्वी झाला आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पक्ष स्वतंत्रपणे लढले होते. त्यावेळी भाजपाने १२२ जागा जिंकल्या होत्या. तर शिवसेनेला ६३ जागांवर समाधान मानावे लागले होते. दरम्यान, भाजपाचं हे विस्तारवादी धोरण सध्या भाजपासोबत असलेल्या शिंदेंच्या शिवसेनेसाठीही डोकेदुखी ठरू शकतं. आधीच अजित पवारांना महायुतीत घेऊन भाजपाने एकनाथ शिंदे यांना मोठा धक्का दिला आहे. आता भाजपा आणि शिंदे गटामधील युतीची कालमर्यादा ही अजित पवार गटाला सोबत घेऊन महाराष्ट्रात सरकार चालवण्याबाबत भाजपाच्या विश्वासावर अवलंबून आहे. तसेच छोट्या पक्षांसोबत भाजपाची ज्याप्रकारे तडजोडी करते ते पाहता सध्यासाठी भाजपाचं एनडीए मॉडेल हे १९९९ ते २०१४ या काळात महाराष्ट्रामध्ये काँग्रेसने राबवलेल्या व्यवस्थेचा नवा अवतार आहेत. त्यामध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात पश्चिम महाराष्ट्रातील ५८ जागांबाबत देवाणघेवाण होऊ शकते. या पश्चिम महाष्ट्रातील ग्रामीण भागात अजित पवार यांची ताकद आहे. तर शहरी भागात भाजपाचा वरचष्मा आहे. अशा परिस्थितीत भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचं समिकरण जुळून येऊ शकतं. मात्र भाजपा आणि शिवसेना शिंदे गटामध्ये असं फार काही नाही आहे. ही बाब शिवसेना शिंदे गटासाठी अडचणीची ठरू शकते.

## फडणवीसांच्या सभेत लोकांचा राडा

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसस्था**

योजनेच्या माध्यमातून लोकांना मदत दिली जावी म्हणून लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. असाच कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर शहरात गंगापूर मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब याच्या वतीने आयोजित करण्यात आला. परंतु, या कार्यक्रमात एक अजबच प्रकार घडला आहे. एकीकडे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मार्गदर्शन करत होते. तर दुसरीकडे स्टेजच्या समोरच्या बाजूला लोकांनी तोबा गर्दी करत वाटप करण्यासाठी आणलेल्या लोखंडी पेट्या व आरोग्य कीटच्या व अन्य साहित्यच पळवले. लाभार्थ्यांऐवजी गर्दी केलेल्या लोकांनीच या पेट्या पळवल्याचा धक्कादायक प्रकार घडला. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला असून सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगली आहे. सर्वसामान्य नागरिकांना योजना आणि मदत हवी, असं आपण म्हणतो. त्यानुसार सरकार, लोकप्रतिनिधी वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमांतून नागरिकांना खरंच मदत करण्याचा प्रयत्न देखील करताना दिसतात. पण नागरिकांना त्या मदतीची जाणीव असायला हवी. तसेच ती मदत कुणाला दिली जातेय याचं भान असायला हवं. सर्वांना समान मदत मिळायला हवी ही भावना ठेवायला पाहिजे.



बीड : मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे निमंत्रण पोलीस अधीक्षक मा.नंदकुमार ठाकुर यांना देतांना दै.मराठवाडा पत्रचे संपादक नरनाळे,पत्रकार पांढरपोटे, पत्रकार साळवे इत्यादी.

## फडणवीसांबद्दल ग्रामीण भागात अत्यंत तिरस्कार

**नागपूर । वृत्तसंस्था**

आमदार अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निकाल म्हणजे भविष्यात अजित पवार यांना मुख्यमंत्री पदाच्या स्वप्नावर ठोकलेला अंतिम खिळा आहे; असा खोचक टोला धुळे शहराचे माजी आमदार अनिल गोटे यांनी परिपत्रकाच्या माध्यमातून लगावला आहे. दरम्यान माजी आमदार अनिल गोटे म्हणाले की, विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निकाल कितीही विवादास्पद असला तरी सुध्दा महाराष्ट्राच्या राजकारणांवर दिर्घकाळ परिणाम करणारा तसेच मराठा समाजाचे खच्चीकरण करणारा ठरेल. भाजप संदर्भात बोलताना धरल तर चावत आणि सोडल तर पळत, अशी अवस्था भाजप प्रवेशीत एकनाथ शिंदे व अजित पवार यांची झाली आहे, असे त्यांनी म्हटले आहे. अनिल गोटे म्हणाले की, एकनाथ शिंदे यांचे पद जाईल व नंतरचे मुख्यमंत्री म्हणून अजित पवार होतील, यासाठी पाण्यात देव बुडवून बसलेल्यांच्या देवांच्या नाका-तोंडात पाणी गेले आहे, असे म्हणत एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. अनिल गोटे म्हणाले की, अजित दादांना आता कळेल की, भारतीय जनता पक्षात किती कपटी, कारस्थानी व केसाने गळा कापणारे हृदय शून्य नेते बसले आहेत; अशी भावना देखील गोटे यांनी व्यक्त करत भाजपवर निशाणा साधला आहे. त्याचबरोबर सहा महिन्यांपूर्वी मी व्यक्त केलेला अंदाज खरा ठरण्याचा आनंद असल्याची देखील भावना गोटे यांनी व्यक्त केली आहे.

# गद्दार सरकारला संविधान मान्य नाही -आदित्य ठाकरे

**मुंबई । वृत्तसंस्था**

हे गद्दार देशाचा पाकिस्तान करतायत, असं म्हणत ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटावर थेट वार केला. दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा, हे ब्रीदवाक्य मंत्रालयासमोर लावावं, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं. आमदार अपात्रतेच्या निर्णयावर बोलताना त्यांनी म्हटलं की, लोकशाही मारून टाकणारा हा निकाल आहे. चोरांना, गद्दारांना कायदेशीर मान्यता देणारा निकाल आहे. ही लढाई आता देशाच्या लोकसाहीची आहे. भाजपप्रणित खोके सरकारला संविधान मान्य नाही. २०२४ मध्ये हे सरकार पुन्हा आल्यास भाजपाचे नवे संविधान ते देशावर लादतील, असं म्हणत आदित्य ठाकरेंनी भाजपवर घणाघात केला. सर्वोच्च न्यायालयाने जे सांगितलं नव्हतं, त्यावर ते बोललेत. सर्वोच्च



न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात हा निकाल दिला आणि निवडणूक आयोगाने जो निकाल दिला त्याला साजेसा हा निकाल आहे. त्यामुळे कदाचित हा सर्वोच्च न्यायालयाचा अपमान देखील आहे. आता फासावर लटकवले तरी चालेल पण लोकशाही आणि बाबासाहेबांचे संविधान आम्ही मारू देणार नाही, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं. शिवाजी पार्क आर्ट फेस्टिवलच्या उद्घाटन कार्यक्रमाला आदित्य ठाकरेंनी हजेरी लावली. त्यावेळी ते बोलत होते. तेजस वाईल्ड लाईफ फिल्डमध्ये आहे. त्यामुळे त्याला कळतं कोण विषारी आहे आणि कोम विषारी नाही, असं म्हणत आदित्य ठाकरेंनी तेजस ठाकरेंवर भाष्य केलं. ज्या अध्यक्षांनी कायदा आणि निकाल दिल्लीवरून लिहून घेतला आहे.राष्ट्रवादीबद्दलही असेच निकाल येणार आहेत, असं म्हणत राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रता प्रकरणावर देखील आदित्य ठाकरेंनी निशाणा साधला. मूळ राजकीय पक्ष संदर्भात विधानसभा अध्यक्ष यांनी दिलेला निर्णय निर्लज्जपणाचा कळस आहे, लोकशाहीच्या हत्या करणारा आहे.विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय देशासाठी मोठे संकेत आहेत. २०२४ मध्ये अशा प्रकारची गद्दारी झाली तर, खोक्यांचा राजकारण झालं तर असंच त्यांना वाचवलं जाणार. भाजपाला आपलं संविधान बदलायचंय. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहून दिलेले संविधान भाजपला मान्य नाही, भाजपला स्वतःच संविधान घ्यायचा आहे ते स्पष्ट झालं. नेक वर्षे राहुल नार्वेकर आमच्या पक्षात होते, तेव्हा ते कुठल्या पक्षप्रमुखाच्या तिकिटावर लढत होते ? असा सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित करत नार्वेकरांवर निशाणा साधला. उद्धव ठाकरे आजारी असताना यांनी गद्दारी केली असल्याचं आदित्य ठाकरेंनी म्हटलं.

## शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शिवसेना कटीबध्द

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व आमदार तथा मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी



पोतदार साहेब, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनीलजी धांडे सर, माजी मंत्री तथा सहसंपर्कप्रमुख बदामराव आबा पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या पाटोदा तालुक्यातील दौऱ्यामध्ये शेतकऱ्यांनी काही समस्या व्यक्त केल्या त्याची दखल शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सरांनी तात्काळ घेऊन लगेचच तहसील गाठले व शेतकऱ्यांच्या विविध विषयावर तहसीलदार साहेबांसी चर्चा करून निवेदन सादर केले .

# राज्यातील बेरोजगारांचे भवितव्य घोटाळेबाजांमुळे खराब -वडेट्टीवार

**मुंबई । वृत्तसंस्था**

मागील काही दिवसांपासून पेपरफुटीची अनेक प्रकरणे समोर आली. नुकतेच राज्यात झालेल्या तलाठी पेपरफुटीच्या प्रकरणावरून मोठा वाद सुरू झाला आहे. यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचे सत्र सुरू झाले आहे. यातच आता विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. उत्तर पत्रिका मिळवून दहा लाखात तलाठी व्हा, असे आमिष उमेदवारांना दाखवले जात असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हंटले आहे. विजय वडेट्टीवार यांनी ट्विट करत सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे. त्यांनी ट्विट मध्ये लिहिले की, राज्यातील परीक्षा घोटाळ्यांवर सरकारने श्वेत पत्रिका काढावी तसेच सर्व परीक्षा एम.पी.एस.सी. मार्फत घेण्यात याव्यात ही मागणी मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे केली आहे. सरकारने खासगी आयटी कंपन्यांना नफा मिळवून देण्याचा उद्योग बंद करायला हवा. सरकारच्या दुर्लक्षामुळे राज्यातील बेरोजगारांचे भवितव्य घोटाळेबाजांच्या दावणीला बांधले गेले आहे. राज्यातील परीक्षा घोटाळ्यांवर सरकारने श्वेत पत्रिका काढावी तसेच सर्व परीक्षा एम.पी.एस.सी. मार्फत घेण्यात याव्यात ही मागणी मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे केली आहे. पेपरफुटीची वाढती प्रकरणे लक्षात घेता पारदर्शक पद्धतीने परीक्षा होण्यासाठी टी.सी.एस. व इतर कंपन्यांना देण्यात आलेली मुदतवाढ रद्द करण्यात यावी. पेपर फुटीचा आरोप होत असलेली सध्याची तलाठी पद भरती रद्द करावी. या परीक्षेसंदर्भात होत असलेल्या आरोपांची सरकारने गांभीर्याने दखल



घेण्याची गरज आहे. या संपूर्ण पद भरतीची सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करावी, असे वडेट्टीवार म्हणाले. पुढे त्यांनी म्हंटले, पेपरफुटीच्या रॅकेटमध्ये ढउड कंपनीचे कंत्राटी कर्मचारी सहभागी असल्याची माहिती पुढे आली आहे. छत्रपती संभाजीनगरच्या पोलिसांनी केलेल्या कारवाईतून हे पुढे आले आहे. दहा लाखात तलाठी व्हा! थेट परीक्षा केंद्रात उत्तर पत्रिका मिळवा! अशा पद्धतीने उमेदवारांना अमिष दाखविले जात आहे. परीक्षा सुरू होताच काही वेळात प्रश्नपत्रिका बाहेर येतात. या परीक्षेत उत्तरे पुरविण्यासाठी ३ लाख रूपये घेतले जातात. तळपायाला चिप लावून हिडन कॅमेऱ्याचा वापर करून प्रश्नपत्रिका स्कॅन केली जाते. हे सगळे प्रकार समोर आले आहेत. तरीही सरकार गंभीर नाही, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे.

## संपादकीय

# महाराष्ट्रात घटक पक्षांमुळे भाजप सत्तेत

आगामी लोकसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली असतानाच सर्वच प्रमुख राष्ट्रीय राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. त्याच वेळी निवडणुकीच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावू शकणार्या काही छोट्या राजकीय पक्षांनीसुद्धा आपल्या अपेक्षा व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित विकास आघाडीला जरी 'इंडिया' आघाडीत स्थान देण्यात आल्याचा निर्णय उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी जाहीर केला असला, तरी महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये इतरही छोटे पक्ष अद्यापही तळ्यात की मळ्यात या विचारात आहेत. देशात आणि महाराष्ट्रात सत्तेवर असलेल्या भाजपच्या मित्र पक्षांपैकी रामदास आठवले यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष असो किंवा महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पार्टी हा पक्ष असो किंवा सदाभाऊ खोत यांची रयत संघटना असो या सर्वच पक्षांच्या नेत्यांनी आपल्या अपेक्षा गेल्या काही दिवसांमध्ये व्यक्त केल्या आहेत. या व्यतिरिक्त राजू शेट्टी यांची स्वाभिमानी शेतकरी संघटनासुद्धा कोणती भूमिका घेते हे महत्त्वाचे ठरणार आहे. राज्यात विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारला पाठिंबा देणारे प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांचीसुद्धा भूमिका येत्या काही दिवसांमध्ये महत्त्वाची ठरणार आहे. सर्व छोट्या मोठ्या पक्षांच्या नेत्यांनी गेल्या काही दिवसांमध्ये आगामी कालावधीमध्ये आपली भूमिका काय असेल याबाबत संकेत दिले होते. शिवसेनेत फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना पाठिंबा देणारे बच्चू कडू यांनी गेल्याच आठवड्यात राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांची भेट घेतली होती आणि तेव्हा वेगळ्या चर्चेला तोंड फुटले होते. तेव्हाच आमच्या पक्षाच्या वाढीला जो पक्ष प्रोत्साहन देईल त्या पक्षाच्या पाठीशी आम्ही उभे राहू, अशी स्पष्ट भूमिका बच्चू कडू यांनी जाहीर केली होती. एकनाथ शिंदे जोपर्यंत मुख्यमंत्रिपदावर आहेत तोपर्यंत या सरकारला आमचा पाठिंबा कायम असेल, असे त्यांनी म्हटले आहे. पण लोकसभा निवडणुकीमध्ये एखादी तरी जागा मिळण्याची त्यांची अपेक्षा त्यांनी लपवून ठेवलेली नाही. अनेक वर्षे केंद्रातील आणि राज्यातील भाजपसोबत असलेले रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टीनेसुद्धा लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातून आम्हाला किमान दोन जागा मिळाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना भाजपबरोबर मैत्री राखणारे राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांनीसुद्धा लोकसभा निवडणुकीत आपला योग्य सन्मान राखला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तशाच प्रकारची अपेक्षा सदाभाऊ खोत यांनीही व्यक्त केली आहे. हे सर्वजण भाजपचे मित्र पक्ष असल्यामुळे महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये जागावाटप करत असताना भाजपसमोर अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांनी महाविकास आघाडी किंवा महायुती यांच्यापासून समान अंतर ठेवण्याचा निर्णय घेतला असला, तरी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने जाहीर केल्याप्रमाणे हातकणंगले मतदारसंघांमध्ये राजू शेट्टी यांना पाठिंबा देण्यात येणार आहे. त्यांच्या या निर्णयाला विरोध करणारी भूमिका घेतल्याने कोल्हापूरचे जिल्हाप्रमुख मुरलीधर जाधव यांची याच कारणावरून हकालपट्टी करण्यात आली आहे हे या ठिकाणी महत्त्वाचे आहे. शिवसेनेतून बाहेर पडून एकनाथ शिंदे यांच्याबरोबर जाणार्या खासदारांना पराभूत करण्याच्या दृष्टिकोनातूनच जरी उद्धव ठाकरे यांचा गट अशी रणनीती आखत असला तरी त्यामुळे काही निष्ठावंतांनाही त्रास होत असल्याचा विचारही त्यांना करावा लागणार आहे. याच भूमिकेतून प्रकाश आंबेडकर यांच्या मैत्रीकडेही पहावे लागणार आहे. खरंतर गेल्या लोकसभा निवडणुकीच्या कालावधीमध्ये प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित विकास आघाडीने ओवेसी यांच्या एमआयएमशी युती केली होती आणि या दोन्ही नेत्यांनी महाराष्ट्रभर सभाही घेतल्या होत्या. त्यांना त्या प्रमाणात यश मिळाले नसल्याने पाच वर्षांत पुन्हा एकदा प्रकाश आंबेडकर यांनी वेगळे मित्र शोधण्यास प्रारंभ केला आहे. ज्या प्रकारे त्यांना 'इंडिया' आघाडीत घेण्याबाबत मतमतांतरे होती आणि हा निर्णय घेण्यामध्ये खूप विलंबही लावण्यात आला ते पाहता शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाच्या आग्रहामुळेच कदाचित त्यांचा इंडिया आघाडीमध्ये समावेश करण्यात आला असावा. कारण महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाल्यास प्रकाश आंबेडकर आणि उद्धव ठाकरे गट यांची सध्या राजकीय मैत्री आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षाला इंडिया आघाडीत घेण्याबाबत निर्णय होत नव्हता तेव्हा सर्व ४८ जागा आम्ही लढवू शकतो, अशी घोषणा प्रकाश आंबेडकर यांनी केली होती. आता संजय राऊत यांच्या म्हणण्याप्रमाणे जर त्यांना 'इंडिया' आघाडीत स्थान दिले असेल तर त्यांनाही इंडिया आघाडीच्या माध्यमातून महाराष्ट्रात काही जागा द्याव्या लागणार आहेत. या जागा शिवसेनेच्या कोट्यातूनच द्याव्या लागतील. साहजिकच जेव्हा कोणतीही एखादी महत्त्वाची निवडणूक जवळ आलेली असते तेव्हाच छोट्या राजकीय पक्षांना आपली कामे करून घेणे शक्य होत असते. याच भूमिकेतून हे सर्व राजकीय पक्ष सक्रिय झाले आहेत. मोठे राजकीय पक्ष या छोट्या राजकीय पक्षांच्या पाठबळावर निवडणुकीत मोठे यश मिळवत असतील, तर या छोट्या राजकीय पक्षांना त्यांच्या कामगिरीचे योग्य बक्षीस देणे महत्त्वाचे असते. जेव्हा लोकसभा निवडणुकीसारख्या महत्त्वाच्या निवडणुकीमध्ये जागावाटपाचा प्रश्न समोर येतो तेव्हा मात्र या छोट्या राजकीय पक्षांचा विचार गंभीरपणे आणि प्राधान्याने केला जात नाही. विधानसभा निवडणुकीवेळी तुमचा योग्य सन्मान राखला जाईल या भरवशावर हे छोटे पक्ष लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय पक्षांच्या पाठीशी उभे राहतात. भाजप व काँग्रेस किंवा इतर राष्ट्रीय पक्षांची ही रणनीती आता या छोट्या पक्षांच्या लक्षात आल्यानेच त्यांनी आतापासूनच आपल्या अपेक्षा व्यक्त करायला सुरुवात केली आहे. महादेव जानकर, सदाभाऊ खोत किंवा इतर काही मित्र पक्षांच्या नेत्यांनी भाजपबाबत आपली नाराजी लपवून ठेवलेली नाही. प्रकाश आंबेडकरही सातत्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याबाबत आपली नाराजी व्यक्त करीत असतात. राजू शेट्टी यांना सर्व राजकीय पक्षांची ही रणनीती नक्की माहीत असल्याने त्यांनी कोणाशी युती न करता सर्वांना समान अंतरावर ठेवण्याचा निर्णय घेतला असावा लोकसभा निवडणुकीसारख्या महत्त्वाच्या निवडणुकीच्या कालावधीमध्येच छोट्या राजकीय पक्षांची बार्गेनिंग पॉवर वाढत असल्याने याच कालावधीमध्ये त्यांच्या अपेक्षाही वाढत असतात आणि या अपेक्षा पूर्ण करण्याचे आव्हान आता त्या पक्षांशी मैत्री करणार्या राजकीय पक्षांना पेलावे लागणार आहे तरच ऐन निवडणूक काळात त्यांची नाराजी दूर होऊ शकेल.

# सुवर्ण झळाळी

**नागपूर । वृत्तसंस्था**

राजकीय संकट, अन्य कारणांमुळे नागरिकांचा गुंतवणुकीच्या अन्य पर्यायांवरचा विश्वास काहीसा डळमळीत झाला आहे. त्यामुळे सोन्यात गुंतवणूक केल्यास पैसे सुरक्षित राहतील, ही प्राचीन लोकभावना पुन्हा घट्ट होत आहे. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत झाल्याने २०२४ मध्ये सोन्यात गुंतवणूक करणार्यांची संख्या वाढू शकते. भारतात सोने हे नेहमीच सुरक्षित आणि फायद्याची गुंतवणूक राहिलेली आहे. संकटाच्या काळात त्याच्या मागणीत आणखीच वाढ होते. कारण सोन्यात गुंतवणूक ही सुरक्षित असण्याबरोबरच चांगला परतावा देणारीही आहे. महागाई दर नियंत्रित ठेवण्यासाठी अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून २०२४ मध्ये व्याजदरात कपात करण्याची आशा, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत घट या कारणांमुळे सोन्याच्या गुंतवणुकीत वाढ होऊ शकते. साधारणपणे जगभरातील सर्व देशाच्या केंद्रीय बँका फेडरल रिझर्व्ह बँकेच्या पावलावर पाऊल टाकतात. त्यामुळे फेडरल रिझर्व्ह बँक व्याजदरात कपात करेल, तेव्हा दुसर्या देशांतील केंद्रीय बँकाही व्याजदरात कपात करतील. त्यामुळे कर्ज आणि ठेवीवरच्या व्याजदरात कपात होईल. ठेवीवरच्या व्याजदरात कपात होईल, तेव्हा चांगल्या परताव्यासाठी नागरिक सोन्याकडे वळतील. आज सोन्याच्या गुंतवणूकदारांना चांगला परतावा मिळत आहे. २०२३ मध्ये सोन्यात गुंतवणूक करणार्यांना १६.४ टक्के दराने परतावा मिळाला आणि तो बँक किंवा अन्य सुरक्षित गुंतवणुकीच्या तुलनेत खूपच चांगला आहे. गेल्या दहा वर्षांत सोन्याने १०५ टक्के परतावा दिला तर जागतिक बाजारात सोन्याची किंमत ही ६३ टक्क्यांनी वाढली.

जून २००८ मध्ये दहा ग्रॅम सोन्याची किंमत ही ११,९०१ रुपये होती, तर जून २०१४ मध्ये दहा ग्रॅम सोन्याची किंमत २५,९२४ रुपये होती. त्याचवेळी जून २०१७ मध्ये दहा ग्रॅम सोन्याची किंमत २९,४९९ रुपये होती. ऑगस्ट २०२० मध्ये सोन्यात अभूतपूर्व वाढ झाली आणि ही किमत ५६,४९९ वर पोहोचली. ऑक्टोबर २०२३ मध्ये ही किंमत ६३,३३२ वर पोहोचली. त्याचवेळी आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव प्रतिऔन्स २०५० डॉलर होता. सोन्यात गुंतवणूक करणार्या लोकांत वाढ होत असून, ती २०२४ च्या अखेरपर्यंत दहा ग्रॅम सोन्याची किंमत ७० हजार रुपये होण्याची शक्यता आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव प्रतिऔन्स २४०० डॉलर होईल. सोन्याच्या किमतीत गेल्या पाच दशकांतील चढउतार पाहता अशा प्रकारची स्थिती आगामी पाच-सहा वर्षांतही राहू शकते. त्यामुळे आगामी काळात सोन्याच्या किमती आणखी उच्चांकी पातळीवर राहू शकतात, असे अंदाज बांधले जात आहे. 'बोफा' नावाच्या जागतिक संशोधन संस्थेनुसार जगभरातील केंद्रीय बँकांनी २०२२ आणि २०२३ मध्ये बर्याच प्रमाणात सोने खरेदी केले. २०२२ मध्ये प्रथमच केंद्रीय बँकांनी एक हजार टनपेक्षा अधिक सोने खरेदी केले. २०२३ मध्येही केंद्रीय बँकांनी एक हजार टनपेक्षा अधिक सोने खरेदी केले असून, ते २०२१ च्या तुलनेत अडीचपट अधिक आणि २०२० पेक्षा चारपट अधिक आहे. सध्याच्या काळात जगभरातील सर्व केंद्रीय बँकांच्या राखीव कोट्यात वीस टक्के भागिदारी सोन्याची आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने नऊ टन सोन्याची खरेदी केली, तर पीपल्स बँक ऑफ चायनाने डिसेंबर २०२३ मध्ये २३ टन सोने खरेदी केले. ऐतिहासिक आकड्यांच्या विश्लेषणाच्या आधारावर २०२४ मध्ये जगभरातील सर्व केंद्रीय बँका आपल्या ठेवीची व्याप्ती वाढविण्यासाठी सोन्याची खरेदी करू शकतात. कोरोना काळ, जागतिक अनिश्चितता आणि जागतिक अर्थव्यवस्थेत राहणारी संवेदनशीलता पाहता अमेरिकेसह अनेक विकसित देशांच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती ही संथ राहिली आहे. त्याचवेळी हमास आणि इस्रायल संघर्ष, यामुळे मध्य पूर्व भागात तणावाचे वातावरण आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध दोन वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. परिणामी नागरिक सोन्यात गुंतवणूक करत आहेत. अर्थात, भारत यास अपवाद आहे. कारण या ठिकाणी मंदीतही आणि अर्थव्यवस्था ही चांगली राहत असतानाही सोन्यात गुंतवणुकीचा ट्रेंड राहतो. कारण भारतात प्राचीन काळापासून सोन्यात गुंतवणूक करण्याची परंपरा राहिली आहे. भारतात डिसेंबरपासून लग्नांचा हंगाम सुरू झाला आहे आणि सोन्यांच्या किमतीत वाढ झालेली असतानाही नागरिक आपल्या आर्थिक स्थितीनुसार कमी-जास्त प्रमाणात सोन्याची खरेदी करत असतात आणि करत आहेत. यातही सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतात सोने हे नेहमीच 'सोने' राहिले आहे. कारण भारतातील महिला सोन्याबाबतीत खूपच उत्साही असतात आणि हा अनुभव अनेक काळापासूनचा आहे. प्राचीन काळात तर महिलांसमवेत पुरुषही सोन्याचे दागिने घालत असत. भारतात सोन्याची मागणी ही स्थानिक पातळीवर पूर्ण करता येत नसल्याने दुसर्या देशांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे भारताने देशांतर्गत सोन्याची मागणी पूर्ण करण्यासाठी २०२२ मध्ये सर्वाधिक सोने चीनमधून आयात केले, तर २०२१मध्ये स्वीत्झर्लंडकडून. अर्थात जागतिक अनिश्चिततेमुळे भारतात आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये सोन्याच्या आयातीत २४.१५ टक्के घट झाली आणि ही घट ३५ अब्ज डॉलरवर आली. मात्र, ही तात्पुरती स्थिती आहे. यात बदल झाल्यानंतर भारत पुन्हा सोन्याची आयात करू शकतो. सध्या महागाई अधिक असल्याने आणि शेअर बाजार वगळता बँकिंग आणि अन्य आर्थिक क्षेत्रात ठेवीवरील व्याजदर कमी राहत असल्याने तसेच भू-राजनैतिक संकटासह अन्य कारणांमुळे नागरिकांचा दुसर्या गुंतवणुकीवर विश्वास राहिलेला नाही. अशावेळी सोन्यात गुंतवणूक करून पैसे सुरक्षित ठेवू शकतो आणि चांगला परतावा मिळू शकतो, असे गुंतवणूकदारांना वाटत आहे.

# लोकशाहीची हत्या करणाऱ्या शिंदे सरकारचा महाराष्ट्राची जनताच धडा शिकवणार

**मुंबई । वृत्तसंस्था**

आज दिवसाढवळ्या लोकशाहीची हत्या झाली, आणि लोकांनी ती उघड्या डोळ्यांनी बघितली अशा आशयाचे बॅनर ठाण्यात झळकू लागले आहे. महाविकास आघाडीने हे बॅनर बसविले असून 'अब न्याय जनता करेगी' असा ही उल्लेख करण्यात आला आहे. विधानसभा अध्यक्ष यांनी बुधवारी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल दिला. त्यानंतर शिवसेनेच्या दोन्ही गटाकडून प्रतिक्रिया उमटल्या. एकीकडे जल्लोष दुसरीकडे निषेध असे चित्र पाहण्यास मिळाले. दरम्यान, दोन गटाच्या मित्रपक्षांनी आपापली भूमिका मांडली. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बुधवारी रात्री विमानतळावर आल्यावर त्यांचे दणक्यात स्वागत करण्यात आले. ठाणे आणि बॅनरबाजी ही गोष्ट काही नवीन नाही. नवीन वर्षाच्या शुभेच्छा... ही महाविकास आघाडीने ठाणेकरांना देताना, मुख्यमंत्री शिंदे यांना त्यांच्या ठाण्यातील निवासस्थानच्या जवळील नाक्यावर लावत डिवचण्याचा प्रयत्न केला होता. त्याआधीही शिवसेना शिंदे गट आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यात बॅनर बाजी पाहण्यास मिळाली होती. त्यातच शिवसेना कुणाची या निकालानंतर ठाणे शहरात महाविकास आघाडीने आता बॅनर लावले आहेत.

# सुवर्ण पदकावर नॅन्सीची छाप

**नागपूर । वृत्तसंस्था**

भारताची स्टार नेमबाज नॅन्सी हिने आशियाई ऑलिम्पिक पात्रता फेरीतील महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात विक्रमासह सुवर्णपदकाला गवसणी घातली आणि भारतासाठी पॅरिस ऑलिम्पिक कोटा मिळवला आहे. याच प्रकारात ऑलिम्पियन नेमबाज इलावेनिल वालारिवन हिने रजतपदकाची कमाई केली. पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात महाराष्ट्राच्या रुद्रांक्ष पाटील याने ब्राँझपदकावर नाव कोरले. नॅन्सी हिने विक्रमी २५२.८ गुणांची कमाई करताना सुवर्णपदक मिळवले. इलावेनिल हिचे सुवर्णपदक अगदी थोडक्यात हुकले. तिने २५२.७ गुणांसह रजतपदकावर नाव कोरले. मेहुली घोष हिला २०१० गुणांसह चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. चीनच्या शेन युफान हिने ब्राँझपदक पटकावले. भारताच्या तीन महिला नेमबाजांनी सांघिक प्रकारात सुवर्णपदक पटकावण्याची किमया केली. रुद्रांक्ष पाटील याने पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात २२८.७ गुणांसह ब्राँझपदक मिळवले. दरम्यान, याच स्पर्धेत भारताचा स्टार नेमबाज वरुण तोमर व अव्वल महिला नेमबाज ईशा सिंग यांनी आशियाई पात्रता फेरीत आपआपल्या गटात सुवर्णपदक पटकावले आणि भारतासाठी पॅरिस ऑलिम्पिककोटा मिळवला आहे. वरुण याने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात व ईशा हिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदकावर नाव कोरले.

पान ४ वरून...

## व्दारकादास मंत्री बँकेचे

ओ.टी.एस योजनेचा लाभ देने योग्य नाही तसेच ओ.टी.एस चा लाभ मिळविणे हा कर्जदाराचा मूलभूत हक्क नाही असे नमूद करून कर्जदाराने बँकेच्या ताब्यातील मालमत्तेचे सिल तोडले या बाबतच्या फौजदारी कार्यवाही मध्ये जामीण मिळविते वेळी संबंधीत कोर्टाने घातलेल्या अटीप्रमाणे रु.३५ लाखाचा भरणा केला नाही तसेच मा . उच्च न्यायालयाकडे दाखल याचीकेत तथ्यही सांगीतले नाही त्याचबरोबर त्यांनी न्यायालयाचा केवळ वेळच वाया घातला नाही तर न्यायालयाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे अशा प्रकारचे याचीका कर्त्यावर कठोर कार्यवाही करणे आवश्यक असून त्यांना कोणतीही उदारता दाखवने योग्य नाही असे नमूद करून कोर्टाने कर्जदारास रु.दोन लाखाचा दंड ठोठावला. याप्रकरणी बँकेच्या वतीने ॲडव्होकेट नीलकंठ पी.बांगर यांनी काम पाहिले तर कर्जदार यांचे वतीने ड. सिध्देश्वर ठोंबरे यांनी काम पाहिलेआहे. कर्जदाराने दंडाची रक्कम एक महिन्याच्या आत न भरल्यास जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी त्यांची मालमत्ता जप्त करुन दंडाची रक्कम वसूल करण्याचे आदेश देखील मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत. कोर्टाने कर्जदाराला सुनावलेल्या दंडाची रक्कम सामाजिक कार्यासाठी देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामध्ये ॲडव्होकेट असोशिएशन छत्रपति संभाजीनगर लायब्ररी साठी २५ हजार रुपये.,ॲडव्होकेट असोशिएशन छत्रपति संभाजीनगर यांना २५ हजार रुपये., इंनफंट इंडिया आनंदवन बीड साठी २५ हजार रुपये. ,शांतीवन आर्वी ता.शिरूर कासार यांना २५ हजार रुपये., घाटी रुग्णालय छत्रपति संभाजीनगर यांना ५० हजार रुपये. , व शासकीय कैन्सर हॉस्पिटल छत्रपति संभाजीनगर यांना ५० हजार रुपये देण्याचे आदेशित केले आहे. कर्जदाराकडे असलेली कर्ज बाकी वसूल करणेसाठी बँकेने पुरेशी मालमत्ता तारण घेतलेली होती. तसेच एक रकमी परतफेड योजनेचा लाभ कोणत्या कर्जदारास द्यावयाचा आणि कोणत्या नाकारायचा हा बँकेचा विशेष अधिकार आहे जर कर्जदाराची ऐपत असेल किंवा तारण मालमत्ता जप्त करून पूर्णपणे कर्जफेड होत असेल तर संबंधित कर्जदाराला एक रकमी परतफेड योजनेचा लाभ नाकारन्याचे बँकेचे अधिकार आहेत.तसेच ओ.टी.एस चा लाभ मिळविणे हा कर्जदाराचा मूलभूत हक्क नाही. असे नमूद करत उच्च न्यायालय औरंगाबाद येथे कर्जदाराने दाखल केलेल्या दोन रिट याचीका कोर्टाने फेटाळून लावल्या.

## भूमी अभिलेख

याबाबत शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबून तात्काळ भूमी अभिलेख कार्यालयातील प्रमुख अधिकाऱ्यांना जबाबदार धरून कामचुकार, अधिकारी, कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड. गोले पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकार केली असून दि.११ जान्वेवारी गुरुवार रोजी सकाळी ११:०० वा. स्टिंग ऑपरेशन केले असता ही बाब निदर्शनास आली.

## पतसंस्था व

राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, बुलढाणा अर्बन मल्टिस्टेटचे राधेश्याम चांडक, मल्टिस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांच्या माध्यमातून ठेवीदारांच्या ठेविना विम्याचे संरक्षण देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी सांगितले.सध्याचे हे युग स्पर्धेचे युग आहे. स्पर्धा ही सर्वच क्षेत्रात वेगाने सुरू झाली आहे. या स्पर्धांची भूरळ सहकार संस्थांना देखील पडलेली दिसून येत आहे. या स्पर्धेत ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी खाजगी संस्था जास्तीचे व मनमानी व्याजदर देण्याचे आमिष ग्राहकांना देत आहेत. या आमिषाला ग्राहक देखील मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. जास्तीच्या व्याज दराच्या अमिषाला बळी जाऊन ग्राहक आपली जमापुजी या संस्थामध्ये जमा करत आहेत. मात्र या ठेवी परत करण्याची जेव्हा वेळ येते त्यावेळेस मात्र संस्था आर्थिक विवंचनेत सापडल्याच्या दिसून येतात.

## जि.प.माध्यमिक

तारडे, आशा कार्यकर्त्या सुषमा कापरे यांची प्रमुख उपस्थिती होती. किशोरवयात मुलींच्या मनात वेगवेगळे प्रश्न निर्माण होत असतात. ते प्रश्न समजून घेतले पाहिजेत.

## रस्ते कामांचा अन

सभापती बद्रीनाथ जगताप, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय आजबे, अड.बाळासाहेब झांबरे, गौतम आजबे, माजी सभापती दत्तात्रय जेवे, उपकार्यकारी अभियंता दिलीप साळवी, ठेकेदार संजय लाटे, आदी उपस्थित होते.

## जाहिर प्रगटन

मा.एस.बी.बेग सह दिवाणी न्यायाधीश
व.स्तर,बीड,ता.जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दि.अर्ज क्र. १३/२०२४ काशिबाई
वि.निरंक

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार : १) काशिबाई जिजा वाघमारे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, पत्ता : एकता नगर, इदगाह रोड, बीड, ता.जि.बीड, २) नितीन पि. जिजा वडमारे, वय ३० वर्षे, धंदा नौकरी, एकता नगर, इदगाह रोड, बीड, ता.जि.बीड, ३) सुबोध जिजा वडमारे, वय २६ वर्षे, धंदा शिक्षण, एकता नगर, इदगाह रोड, बीड, ता.जि.बीड

विरुध्द निरंक

**वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.**

ज्याअर्थी मयत नामे **जिजा भाऊ वडमारे** हे राहणार **बीड, ता.जि.बीड हे दिनांक १७/१२/२०२१** रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयत नामे **जिजा भाऊ वडमारे** यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयत नामे **जिजा भाऊ वडमारे** यांचे निधन झाले. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरिता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की,सदरहू अर्जदार सदहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहू मयत **जिजा भाऊ वडमारे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०९/०२/२०२४ आहे.**

**आज दिनांक १०/०१/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**

क.लिपीक
सह दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड आदेशावरुन

मार्फत
ॲड. संजोत महाजन

कोर्टाचा शिक्का

स्वाक्षरीत
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

**नमुना इ-४ [ नियम १८ पहा]**

**निवडणूक निर्णय अधिकारी — यु.व्ही.सुतार** **पदनाम - सहकार अधिकारी श्रे-२**

**सहकारी संस्थेचे नाव :- विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या. चारदरी ता.धारुर जि.बीड** **अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक २६/१२/२०२३**

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणुक नियम २०१४ च्या नियम १८ प्रमाणे अधिकाराचा वापर करुन आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे व मा.जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरिता मी, **यु.व्ही.सुतार**, सहकार अधिकारी श्रे-२, सलग्न सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारुर जि. बीड, आणि मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड आणि प्राधिकरण यांच्या मान्यतेने, **विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या. चारदरी ता.धारुर जि.बीड** या संस्थेच्या समितीच्या सदस्यांची सन २०२३-२०२८ या कालावधीची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी, याद्वारे **विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या. चारदरी ता.धारुर जि.बीड** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन जाहीर करीत आहोत आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ-२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणुक नियत करीत आहोत.

**अनुसूची**

| अ. क. | मतदार संघाचे नांव | | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्रांची यादीचे प्रकाशन | नामनिर्देशनपत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | विधीग्राहय नामनिर्देशनपत्रांची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक व वेळ,स्थळ | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सर्वसाधारण कर्जदार प्रतिनिधी | ८ | दि. १२.०१.२०२४ ते दि. १८.०१.२०२४ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि. १२.०१.२०२४ ते दि. १८.०१.२०२४ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायं ५.०० वा. (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि. १९.०१.२०२४ सकाळी ११.०० पासून छाननी संपेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि. २२.०१.२०२४ सकाळी ११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि. २२.०१.२०२४ ते दि.०५.०२.२०२४ वेळ स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि. ०६.०२.२०२४ स. ११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि. १८.०२.२०२४ वेळ -सकाळी ७.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत स्थळ- जि.प.प्रा.शाळा चारदरी | दि. १८.०२.२०२४ वेळ व ठिकाण स्थळ- जि.प.प्रा.शाळा चारदरी | दि. १८.०२.२०२४ रोजी मतमोजणी संपलेनंतर लगेच. |
| २ | महिला प्रतिनिधी | २ | | | | | | | | | |
| ३ | अनुसुचित जाती/जमाती सदस्य | १ | | | | | | | | | |
| ४ | भटक्या विमुक्त जाती / जमाती व विशेष मागासप्रवर्ग सदस्य | १ | | | | | | | | | |
| ५ | इतर मागासवर्गीय सदस्य | १ | | | | | | | | | |
| | **एकुण** | **१३** | | | | | | | | | |

वरिल अनुसुचिमधील क्र. ०३ ते ०८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता- कार्यालय, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारुर जि. बीड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयासमोर, केजरोड, धारुर असा राहील.

मो.नं. ८८५५९३२८२९

**(यु.व्ही.सुतार)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या.चारदरी ता.धारुर जि. बीड**

**(समृत जाधव)**
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,**
**तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड**

**(अशोक गाडे)**
**सचिव, राज्य सहकारी निवडणूक**
**प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे**

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# राज्यात पीक विम्याचे बनावट अर्ज; केंद्र सरकारकडून राज्य सरकारची फसवणूक;

मुंबई । वृत्तसंस्था

**प्रधानमंत्री खरीप पीक विमा योजनेत शेतकऱ्यांना एक रुपयात विमा उपलब्ध करून दिल्यानंतर अर्ज भरण्यासाठी राज्य सरकारतर्फे सामायिक सुविधा केंद्र चालकांना प्रत्येक अर्जामागे चाळीस रुपये अनुदान देण्यात आले. मात्र, या केंद्र चालकांनी राज्य सरकारची फसवणूक करत सुमारे ९ हजार बनावट अर्ज दाखल केल्याचे उघड झाले आहे. या अर्जाद्वारे तब्बल ४८ हजार हेक्टरवरील पिकांना विमा संरक्षण देण्यात आल्याची गंभीर बाब उघड झाल्यानंतर कृषी विभागाने अशा अकरा सामायिक सुविधा केंद्रांना टाळे ठोकले आहेत, तसेच हे सर्व बनावट अर्ज बाद केल्याने राज्य सरकारचा विमा कंपन्यांना द्यावा लागणारा ३८ कोटींचा विमा हप्ता वाचला आहे. राज्य सरकारने यंदा प्रधानमंत्री खरीप पीक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात विमा उपलब्ध करून दिला. या योजनेला शेतकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद देत तब्बल १ कोटी ७० लाख अर्जांद्वारे १ कोटी १३ लाख हेक्टरवरील पिकांचा उमा विमा उतरवला. शेतकऱ्यांना अर्ज भरण्यासाठी सामायिक सुविधा केंद्रांना परवानगी देण्यात आली होती. त्यासाठी राज्य सरकारने प्रत्येक अर्जामागे या केंद्रांना चाळीस रुपयांचे अनुदान दिले आहे. मात्र, या केंद्रचालकांनी ज्यादा अनुदानापोटी तसेच काही कंपन्यांच्या सांगण्यावरून बनावट अर्ज दाखल केल्याचे कृषी विभागाच्या पडताळणीत उघड झाले आहे.**

असे बनावट अर्ज भरताना या केंद्रचालकांनी शेतकऱ्याच्या नावावर शेती नसतानाही दुसऱ्या शेतकऱ्याची जमीन विमा संरक्षित केली. दुसऱ्या शेतकऱ्याच्या संमतीशिवाय त्याच्या जमिनीचा विमादेखील उतरवला. महापालिका, नगरपालिका, औद्योगिक, अकृषक जमिनीचा देखील विमा उतरवण्याचे धाडस या केंद्रचालकांनी केले आहे. त्याचप्रमाणे वन विभाग, पाटबंधारे विभाग, मंदिरांच्या जमिनी किंवा इतर संस्थांच्या जमिनींचा देखील विमा उतरवण्याचे प्रकार या पडताळणीत आढळून आले आहेत. सातबारा, आठ अ उताऱ्यावर असलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त जमीनदेखील या केंद्रचालकांनी विमा उतरवून दिला.

कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक तपासणीमध्ये ११ निवडक सामायिक सुविधा केंद्रांनी हे गैरप्रकार केल्याचे उघड झाले आहे. या केंद्रांनी ८ हजार ९१६ असे बनावट अर्ज दाखल केल्याचे उघड झाले. या अर्जांद्वारे तब्बल ४८ हजार १९८ हेक्टरवरील पिकांना विमा संरक्षण देण्यात आले. त्यापोटी त्यांनी २९५ कोटी ८६ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळवले होते. त्यातून राज्य सरकारला जवळपास ३८ कोटी ५६ लाख रुपयांचा विमा हप्ता कंपन्यांना द्यावा लागणार होता. ही बनावटगिरी उघड झाल्यानंतर कृषी विभागाने तातडीने या सर्व केंद्रचालकांची नोंदणी रद्द केली आहे, तसेच सर्व ८ हजार ९१६ विमा अर्जदेखील रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

या अकरा सुविधा केंद्रांमध्ये नगर जिल्ह्यातील ५, संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील प्रत्येकी २ व नाशिक व परभणी जिल्ह्यातील प्रत्येकी एका केंद्राचा समावेश आहे. यात जालना जिल्ह्यातील एका केंद्रचालकाने तब्बल वीस हजार हेक्टरवरील पिकांचा विमा उतरला होता. त्यासाठी १ हजार ६०५ शेतकऱ्यांचे बनावट अर्ज दाखल केले होते, तर संभाजीनगर जिल्ह्यातील एका केंद्राने ४०४ शेतकऱ्यांच्या अर्जाद्वारे १२ हजार १७५ हेक्टर पिकांचा बनावट विमा उतरवला होता. जालना जिल्ह्यातील आणखीन एका केंद्राने ६०१ बनावट अर्जांद्वारे ११ हजार ८११ हेक्टरवरील पिकांचा विमा उतरवला आहे.

प्रधानमंत्री खरीप पीक विमा योजनेत शेतकऱ्यांना एक रुपयात विमा उपलब्ध करून दिल्यानंतर अर्ज भरण्यासाठी राज्य सरकारतर्फे सामायिक सुविधा केंद्र चालकांना प्रत्येक अर्जामागे चाळीस रुपये अनुदान देण्यात आले. मात्र, या केंद्र चालकांनी राज्य सरकारची फसवणूक करत सुमारे ९ हजार बनावट अर्ज दाखल केल्याचे उघड झाले आहे. या अर्जाद्वारे तब्बल ४८ हजार हेक्टरवरील पिकांना विमा संरक्षण देण्यात आल्याची गंभीर बाब उघड झाल्यानंतर कृषी विभागाने अशा अकरा सामायिक सुविधा केंद्रांना टाळे ठोकले आहेत, तसेच हे सर्व बनावट अर्ज बाद केल्याने राज्य सरकारचा विमा कंपन्यांना द्यावा लागणारा ३८ कोटींचा विमा हप्ता वाचला आहे. राज्य सरकारने यंदा प्रधानमंत्री खरीप पीक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात विमा उपलब्ध करून दिला. या योजनेला शेतकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद देत तब्बल १ कोटी ७० लाख अर्जांद्वारे १ कोटी १३ लाख हेक्टरवरील पिकांचा उमा विमा उतरवला. शेतकऱ्यांना अर्ज भरण्यासाठी सामायिक सुविधा केंद्रांना परवानगी देण्यात आली होती. त्यासाठी राज्य सरकारने प्रत्येक अर्जामागे या केंद्रांना चाळीस रुपयांचे अनुदान दिले आहे. मात्र, या केंद्रचालकांनी ज्यादा अनुदानापोटी तसेच काही कंपन्यांच्या सांगण्यावरून बनावट अर्ज दाखल केल्याचे कृषी विभागाच्या पडताळणीत उघड झाले आहे. असे बनावट अर्ज भरताना या केंद्रचालकांनी शेतकऱ्याच्या नावावर शेती नसतानाही दुसऱ्या शेतकऱ्याची जमीन विमा संरक्षित केली. दुसऱ्या शेतकऱ्याच्या संमतीशिवाय त्याच्या जमिनीचा विमादेखील उतरवला. महापालिका, नगरपालिका, औद्योगिक, अकृषक जमिनीचा देखील विमा उतरवण्याचे धाडस या केंद्रचालकांनी केले आहे. त्याचप्रमाणे वन विभाग, पाटबंधारे विभाग, मंदिरांच्या जमिनी किंवा इतर संस्थांच्या जमिनींचा देखील विमा उतरवण्याचे प्रकार या पडताळणीत आढळून आले आहेत. सातबारा, आठ अ उताऱ्यावर असलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त जमीनदेखील या केंद्रचालकांनी विमा उतरवून दिला. कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक तपासणीमध्ये ११ निवडक सामायिक सुविधा केंद्रांनी हे गैरप्रकार केल्याचे उघड झाले आहे. या केंद्रांनी ८ हजार ९१६ असे बनावट अर्ज दाखल केल्याचे उघड झाले. या अर्जांद्वारे तब्बल ४८ हजार १९८ हेक्टरवरील पिकांना विमा संरक्षण देण्यात आले. त्यापोटी त्यांनी २९५ कोटी ८६ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळवले होते. त्यातून राज्य सरकारला जवळपास ३८ कोटी ५६ लाख रुपयांचा विमा हप्ता कंपन्यांना द्यावा लागणार होता. ही बनावटगिरी उघड झाल्यानंतर कृषी विभागाने तातडीने या सर्व केंद्रचालकांची नोंदणी रद्द केली आहे, तसेच सर्व ८ हजार ९१६ विमा अर्जदेखील रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे. या अकरा सुविधा केंद्रांमध्ये नगर जिल्ह्यातील ५, संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील प्रत्येकी २ व नाशिक व परभणी जिल्ह्यातील प्रत्येकी एका केंद्राचा समावेश आहे. यात जालना जिल्ह्यातील एका केंद्रचालकाने तब्बल वीस हजार हेक्टरवरील पिकांचा विमा उतरला होता. त्यासाठी १ हजार ६०५ शेतकऱ्यांचे बनावट अर्ज दाखल केले होते, तर संभाजीनगर जिल्ह्यातील एका केंद्राने ४०४ शेतकऱ्यांच्या अर्जाद्वारे १२ हजार १७५ हेक्टर पिकांचा बनावट विमा उतरवला होता. जालना जिल्ह्यातील आणखीन एका केंद्राने ६०१ बनावट अर्जांद्वारे ११ हजार ८११ हेक्टरवरील पिकांचा विमा उतरवला आहे.

## शिवसेना अपात्रता निकालाचा महाविकास आघाडीवर कोणताही परिणाम होणार नाही -पटोले

**मुंबई । वृत्तसंस्था**

शिवसेनेतील दोन्ही गटांसह महाराष्ट्रातील संपूर्ण राजकीय विश्वाचं लक्ष लागलेल्या आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष यांनी काल निकाल सुनावला. एकनाथ शिंदेंचीशिवसेना हीच खरी शिवसेना असल्याचे सांगतानाच एकनाथ शिंदेंसह १६ आमदारांना अपात्र ठरवण्याची ठाकरे गटाची मागणी यांनी फेटाळून लावली. तसेच शिंदे गटासह ठाकरे गटातील आमदारही पात्र आहेत, असा निकाल दिला. या निकालामुळे शिंदे गटाला मोठा दिलासा मिळाला आहे. तर ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. आता या निकालाचे राज्याच्या राजकारणावर तसेच महाविकास आघाडीवर काय परिणाम होणार याची चर्चा सुरू झाली आहे. त्यावर आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या निकालावर प्रतिक्रिया देताना या निकालाचा महाविकास आघाडीवर काही परिणाम होणार नाही, असे नाना पटोले यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. नाना पटोले म्हणाले की, शिवसेना फुटी प्रकरणातील निकालाचा महाविकास आघाडीवर कोणताही परिणाम होणार नाही. उलट मविआ अधिक मजूबत होईल, भारतीय जनता पक्षाचा डाव उघड झाला असून, जनताच भाजपाचा धडा शिकवेल. एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, निकाल देणारे न्यायाधीश ज्याच्यावर आरोप आहेत त्यांना भेटत असतील तर ते गंभीर आहे. विधानसभा अध्यक्ष यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होता त्यामुळे काही संगनमत झाले का ? अशी शंका येते. असेही पटोले म्हणाले. शिवसेना पक्षातील आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेला निर्णय हा महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणातील काळा दिवस आहे. विधानसभा अध्यक्षपद हे निष्पक्ष असते पण आजचा निकाल पाहता तो निकाल निष्पक्ष वाटत नाही. संविधानाची पायमल्ली करत घटनेतील १० व्या शेड्युलला डावलल्याचे दिसत आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्देशांनाही यावेळी डावलल्याचे स्पष्ट दिसते.

## शेतातील गांजाच्या साठ्यावर छापा

**हिंगोली । वृत्तसंस्था**

वसमत तालुक्यातील खुदनापुर शिवारातील शेतात शासनाने प्रतिबंधित केलेल्या गांजाचा साठ्यावर 'एलसीबी'च्या पथकाने गुरुवारच्या पहाटे छापा टाकला. यावेळी ८९ किलो गांजाचासाठा (किंमत १७ लाख ८३ हजार ९६० रुपये) व मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ग्रामीण पोलिस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसमत तालुक्यात चंदन तस्करी पाठोपाठ गांजाची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. चंदनासाठी ओळखला जाणारा तालुका गांजासाठी ओळखला जात आहे. तालुक्यातील खुदनापूर शिवारात एका शेतात गांजाचासाठा असल्याची माहिती 'एलसीबी'च्या पथकास मिळताच पोलिस अधीक्षक जी. श्रीधर यांच्या मार्गदर्शनाखाली 'एलसीबी' चे पोलिस निरीक्षक पाटील, सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, आकाश टापरे, स. बाबर यांच्यासह एलसीबीच्या पथकाने गुरुवारी पहाटे ३ वाजेदरम्यान आदिनाथ नागोराव चव्हाण यांच्या शेतात छापा टाकला. यावेळी आसता शेतातील विहिरीजवळ ४० पिवळे पॉकिट ज्यात ८९ किलो १९८ ग्रॅम गांजा आढळला. पोलिसांनी तो छापा टाकताच जप्त केला. पोलिस येत असल्याची चाहूल आरोपीस लागताच अंधाराचा फायदा घेत आरोपी पसार झाला. याप्रकरणी सकाळी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे यांच्या फिर्यादीवरून आदिनाथ चव्हाण याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर कदम हे करीत आहेत.

## ठाकरेंच्या हातून पक्षाचा अधिकृत फॉर्म घेताना घराणेशाही नव्हती

**मुंबई । वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री शिंदे यांना २०१९ साली विधानसभेचा एबी फॉर्म घेताना घटना दुरुस्ती, घराणेशाही, एकधिकारशाही वगैरे वगैरे तुम्हाला दिसली नव्हती. हुडी घालून आलेला माणूस रात्रीतून कानगोष्टी करून गेला आणि तुम्हाला अचानक साक्षात्कार झाला होता का ?, असा सवाल विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारला आहे. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा लोकशाही आणि बाळासाहेबांच्या विचारांचा विजय असून घराणेशाही आणि एकाधिकारशाहीचा पराभव आहे असे वक्तव्य केले आहे. दरम्यान या टीकेला उद्धव ठाकरे गटाकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. मुख्यमंत्री शिंदे यांना २०१९ साली विधानसभेचा एबी फॉर्म घेताना घटना दुरुस्ती, घराणेशाही, एकधिकारशाही वगैरे वगैरे तुम्हाला दिसली नव्हती. हुडी घालून आलेला माणूस रात्रीतून कानगोष्टी करून गेला आणि तुम्हाला अचानक साक्षात्कार झाला होता का ? अंबादास दानवे यांनी शेअर केलेला फोटो हा एकनाथ शिंदे याच्या ट्विटचा स्क्रीनशॉट आहे. हे ट्वीट ३०सप्टेंबर २०१९ रोजी करण्यात आले आहे. ज्यामध्ये एकनाथ शिंदे हे उद्धव ठाकरे यांच्या हातून एबी फॉर्म घेताना दिसत आहेत. तसेच या ट्विटमध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांनी आज विधानसभा निवडणूक २०१९ करिता कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेतर्फे अधिकृत उमेदवार म्हणून एबी फॉर्म देऊन पुन्हा एकदा माझ्यावर विश्वास दर्शविला. मा. उद्धव ठाकरे साहेबांचे मनस्वी आभार, असे ट्विट केल्याचा फोटो पोस्ट करत टीकास्त्र डागले आहे.

## अपात्रता निकाल राजकीय षडयंत्र, सहानुभूती मिळू नये म्हणून ठाकरे गटाला ठरवले पात्र -विजय वडेट्टीवार

**मुंबई । वृत्तसंस्था**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आमदार पात्रतेप्रकरणी दिलेला निकाल हा स्क्रिप्टेड होता. मुद्दाम वेळ वाढवून उशिराने निकाल दिला गेला. एकास पात्र आणि दुसऱ्यास अपात्र ठरवले असते तर जनतेचा उद्रेक झाला असता म्हणून दोन्ही गटास पात्र करण्यात आले आहे. मात्र हा अंतिम निकाल नाही. राज्यातील जनता योग्यवेळी त्यांना आपली जागा दाखवेल, या शब्दांत विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली. मीडियाशी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने भरत गोगावले यांची प्रतोद म्हणून निवड अवैध ठरवली असताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ती वैध ठरवली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अवमान करत कायद्याप्रमाणे निकाल दिला नाही. या निकालात पक्षांतर बंदी कायद्याची खिल्ली उडविण्यात आली आहे. देशातील लोकशाही संपविण्यासाठी हा घातक निर्णय आहे, या शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी निशाणा साधला. सहानुभूती मिळू नये म्हणून दोघांनाही पात्र केले आहे. देशाची घटना शिल्लक राहिली पाहिजे. शिंदे गटाला पात्र ठरवले आहे आणि उद्धव ठाकरे गटाला अपात्र ठरविले असते तर सहानुभूती मिळाली असती, असे म्हणत पैशाच्या आणि सत्तेच्या बळावर चाललेली मस्ती खपवून घेतली जाणार नाही. ठाकरे आणि मराठी माणूस हे एक समीकरण आहे. हा निकाल मराठीत वाचणे अपेक्षित होते. मात्र तो इंग्रजीत वाचण्यात आला, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. दरम्यान, बहुमताच्या आधारावर शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच आहे. शिवसेनेची २०१८ची घटनाच ग्राह्य धरता येत नाही. उद्धव ठाकरे यांचे पक्षप्रमुखपदच अस्तित्वात नाही. घटनेनुसार अधिकार कार्यकारिणीला असून, पक्षप्रमुख म्हणून एकनाथ शिंदे यांना पदावरून हटविण्याचा अधिकार ठाकरे यांना नाही. त्यामुळे शिंदेंनी नियुक्त केलेले भरत गोगावले हेच पक्षाचे व्हिप असून, सुनील प्रभू यांना व्हिप बजावण्याचा अधिकार नाही. दोन्ही गटांच्या व्हिपमध्ये कारवाईबाबत कोणतीही ठोस नोंद नसल्याने दोन्ही गटांच्या आमदारांना अपात्र ठरविता येत नसल्याचा महत्त्वपूर्ण निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला.



## ३१ जानेवारीपासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन; १ फेब्रुवारीला होणार बजेट सादर

**नागपूर । वृत्तसंस्था**

संसदेच अर्थसंकल्पीय अधिवेशन३१ जानेवारीपासून सुरू होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन ०१ फेब्रुवारी २०२४ रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर करणार आहेत.संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन३१ जानेवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान चालणार आहे. निर्मला सीतारामन मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील शेवटचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत.३१ जानेवारीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकार या अंतरिम बजेटमध्ये महिला आणि शेतकऱ्यांशी संबंधित मोठ्या घोषणा करू शकते, असा कयास बांधला जात आहे. तसेच अंतरिम अर्थसंकल्पात महिला शेतकऱ्यांसाठी पीएम किसान सन्मान निधी दुप्पट करण्याचा प्रस्ताव असू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे. संसदेचे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील शेवटचे अधिवेशन असेल.संसद सुरक्षेच्या मुद्द्यावरून हिवाळी अधिवेशन चांगलेच गाजलेसंसदेचे हिवाळी अधिवेशन गेल्या वर्षी ४ डिसेंबरपासून सुरू झाले होते, जे नियोजित वेळेच्या एक दिवस आधी संपले. संसदेच्या लोकसभा सभागृहात घुसून काही जणांनी गोंधळ घातला. संसद सुरक्षेच्या मुद्द्यावरून हिवाळी अधिवेशन चांगलेच गाजले. या घटनेचे तीव्र पडसाद उमटले. विरोधकांनी हा मुद्दा चांगलाच लावून धरला होता. यामुळे विरोधी पक्षातील शेकडो सदस्यांना राज्यसभा आणि लोकसभा या दोन्ही सभागृहातून निलंबित करण्यात आले.दरम्यान, या घटनेनंतर पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांना संसदेत निवेदन देण्याची मागणी विरोधकांनी केली होती. या मागणीवर विरोधक ठाम राहिले. विरोधकांनी संसद संकुलातील गांधी पुतळ्यासमोर निदर्शने केली. यादरम्यान तृणमूलच्या एका खासदाराने राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची नक्कल केली, त्यानंतर बराच गदारोळ झाला. तसेच तृणमूलच्या खासदार महुआ मोइत्रा यांना कॅश फॉर क्वेरी प्रकरणात अपात्र ठरवण्यात आले.

## ३० ग्रामपंचायतींनी थकवले जि.प.चे कर्ज

**नगर । वृत्तसंस्था**

विकासकामांसाठी जिल्हा परिषदेकडून घेतलेले कर्ज मुदत उलटून गेल्यानंतरही न भरल्याने ग्रामपंचायत विभागाने अशा थकीत ३० ग्रामपंचायतींवर कारवाईचा इशारा दिला आहे. येत्या दहा दिवसांत हे कर्ज भरले नाही, तर सरपंच व ग्रामसेवकावरकारवाई करू, असे ठणकावल्याने या ग्रामपंचायती धास्तावल्या आहेत. ग्रामपंचायतींना विविध विकासकामे करण्यासाठी अल्प दरात कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी शासनामार्फत जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा ग्राम विकास निधीची स्थापना करण्यात येते. यामध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीने त्यांच्या उत्पन्नाच्या ०.२५ टक्के अंशदान रक्कम जमा करणे बंधनकारक असते. जमा रकमेतून ज्या ग्रामपंचायतींना विकास कामांसाठी कर्ज आवश्यक आहे अशा ग्रामपंचायतींना त्यांच्या उत्पन्न व शिल्लक निधीचा ताळमेळ घेऊन जिल्हा परिषद कर्ज मंजूर करते. कर्ज घेतल्यानंतर ५ टक्के दराने त्याची दहा समान हफ्त्यांत परतफेड करणे बंधनकारक आहे. जि. प. चे. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी नुकताच या संबंधी आढावा घेतला असता ही बाब लक्षात आली. त्यांच्या सूचनेनुसार थकित ग्रामपंचायतींची बैठक ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांनी मागील आठवड्यात घेतली. यासाठी संबंधित कर्जदार ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामसेवक उपस्थित होते. बैठकीत दहा वर्षांपूर्वीचे प्रलंबित कर्ज व नियमित कर्ज परतफेड न करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या समस्या व अडचणी जाणून चर्चा करण्यात आली.

## मुख्यमंत्री शिंदेच्या राजकारणात घराणेशाही नाही का ? ठाकरे गटाचा हल्लाबोल

**मुंबई । वृत्तसंस्था**

विधानसभा अध्यक्ष  यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्ष हाच मूळ शिवसेना असल्याचा निकाल दिला. या निकालामुळे शिंदे यांच्या गोटात आनंदाचं वातावरण असून या निकालाचा आधार घेत एकनाथ शिंदे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्षपणे जोरदार टीका केली. निकालावरून एकाधिकारशाही आणि घराणेशाही मोडीत निघाली आहे. पक्ष स्वतःची संपत्ती समजून कोणीही मनाला वाटेल तसा निर्णय घेऊ शकत नाही. पक्ष म्हणजे प्रायव्हेट लिमिटेड प्रॉपर्टी नव्हे, हे भानही या निकालाने दिलं आहे, अशा शब्दांत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं. एकनाथ शिंदे यांनी घराणेशाहीवरून उद्धव ठाकरेंवर केलेल्या टीकेनंतर आता ठाकरे गटाने पलटवार केला आहे. श्रीकांत शिंदे एकनाथ शिंदेंचा मुलगा नाही का ? असं म्हटलं आहे. तसेच शिवसेनेला इतिहासात जमा करणारे स्वतः गाडले गेले असं म्हणत हल्लाबोल केला आहे. एकनाथ शिंदे घराणेशाहीचा अंत झाल्याचं म्हणतात मग श्रीकांत शिंदे त्यांचा मुलगा नाही का ?, सिद्ध करा नाही म्हणून, श्रीकांत शिंदेंसाठी मुलगा म्हणूनच मत मागितलं ना. बाळासाहेब ठाकरे यांची घराणेशाही कधीच नव्हती. शरद पवारांची घराणेशाही कधीच नव्हती, यशवंतराव चव्हाणांची घराणेशाही कधीच नव्हती. विचारांचा वारसा पुढे घेऊन जाणारा एक मार्ग असतो. एकनाथ शिंदे हे भारतीय जनता पक्षाच्या हुकूमशाहीचे पुरस्कर्ते आहेत. शिवसेनेला इतिहासात जमा करणारे स्वतः गाडले गेले असं म्हणत संजय राऊत यांनी निशाणा साधला आहे. विधानसभा अध्यक्षांनी शिंदे गटाचे वकील म्हणून काम केले. ते शिंदे यांच्या फुटलेल्या गटासाठी वकीली करावी असे ते निकालपत्राचे वाचन करत होते. प्रत्येक कागदपत्र त्यांच्यासमोर ठेवलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले होते की भरत गोगावले यांची केलेली निवड चुकीची आहे. आम्ही निश्चितपणे सर्वोच्च न्यायालयात जाऊ. कालच्या निर्णयानंतर प्रश्न निर्माण झाले आहे. निर्णय खरा की खोटा हे त्यांनी स्वतःला विचारावं असं देखील  ठाकरे गटाने म्हटलं आहे.

# व्दारकादास मंत्री बँकेचे कर्ज थकवणाऱ्या कर्जदाराला न्यायालयाचा दणका

**बीड । प्रतिनिधी**

येथील व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेचे थकीत कर्जदार नयन मोटर्स प्रो.प्रा.सुरजमल गांधी यांनी बँकेकडून घेतलेले ३५ लाखाचे कर्ज रक्कम भरणा न करता बँकेकडे वारंवार ओ.टी.एस. ची मागणी केली. बँकेने ओ.टी.एस न करता कर्जदाराची मालमत्ता जप्त करत कर्ज वसुलीसाठी कार्यवाही सुरु केली. मात्र कर्जदाराने बाकी भरणा न करता. वारंवार उच्च न्यायालयामध्ये रिट याचीका दाखल करून ओ.टी.एस योजनेचा लाभ मिळणेसाठी प्रयत्न केले. कोर्टाने सुचविल्या प्रमाणे रक्कम हि भरली नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी कर्जदाराची ओ.टी.एस योजनेचा लाभ मिळण्याची रिट याचीका क्र.९४५६/२०२३ फेटाळून कोर्टाचा वेळ वाया घातला. तसेच कोर्टाने रक्कम भरण्याचे सुचवले असतांनाही ती बँकेला न भरल्यामुळे कर्जदाराला दोन लाखाचा दंड ठोठावला.

बीड येथील व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँक लि. बीड च्या श्रीरामपूर शाखेचे थकीत कर्जदार नयन मोटर्स प्रो.प्रा. प्रदीप सुरजमल गांधी यांनी बँकेकडून सन २००४ मध्ये पस्तीस लाखाचे कर्ज घेतले होते. कर्ज घेतेवेळी पुरेशी मालमत्ता बँकेस गहाणखत करून दिलेली होती. कर्ज थकीत झाल्यानंतर बँकेने कर्जदारावर सरफेसी कायद्याअंतर्गत वसुलीची कार्यवाही सुरु केली. यामध्ये कर्जदाराने काही दिवस अडथळा निर्माण केला. नंतर बँकेने कर्जदार यांनी कर्जास तारण दिलेली मालमत्ता दि. २५ एप्रिल २०१८ रोजी जप्त केली. व सील केली. कर्जदाराने सील केलेल्या मालमत्तेचे कुलुपे तोडून अवघ्या तीन दिवसात पुन्हा मालमत्ता स्वतः च्या ताब्यात घेतली. त्यामुळे बँकेने दि. १ मे २०१८ रोजी कर्जदारावर फौजदारी गुन्हा क्र.१३८/२०१८ श्रीरामपूर पोलीस स्टेशन येथे दाखल केला. या प्रकरणी कोर्टाने जामीन देताना कर्जदाराने ३५ लाख रुपये चार हप्त्यात बँकेत ताबडतोब भरणा करावेत असे आदेश दिले. परंतु कर्जदाराने हि रक्कम भरणा केली नाही. याप्रकरणी त्यांना एक महिन्याची सजा झाली. कर्जदाराने कर्ज बाकी भरणा केली नाही. उलट महाराष्ट्र शासनाचे ओ.टी.एस योजनेचा लाभ मिळणेसाठी बँकेस वेळोवेळी दबाव आणला व उच्च न्यायालय औरंगाबाद येथे दोन रिट याचीका दाखल केल्या. दोन्ही याचीका कोर्टाने फेटाळून लावल्या. कर्जदाराकडे असलेली कर्ज बाकी वसूल करणेसाठी बँकेने पुरेशी मालमत्ता तारण घेतलेली होती. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे बँकेने कर्जदार व जामीनदार यांचे विरुद्ध वसुली दाखला मिळवलेला आहे. या दाखल्याआधारे बँकेने कर्जदार व जामीनदार यांची तारण असलेली व तारण नसलेली मालमत्ता जप्तीची देखील कार्यवाही चालू केली. अशा प्रसंगी ऐपत असणार्या व जाणीवपूर्वक कर्ज थकवणार्या कर्जदारास ओ.टी.एस चा लाभ देणे हे बँकेस नुकसानदायी असल्यामुळे तसेच बँकेवर मा.भारतीय रिझर्व बँकेचे ३५ (–) नुसार निर्बंध असल्यामुळे बँक व बँकेचे ठेवीदार अडचणी मधे आहे. त्यामुळे बँकेने ओ.टी.एस.योजना स्वीकारली नाही. व सदर कर्जदार यांना अशी सवलत दिली नाही. ही बाब बँकेचे वकील एन पी बांगर यांनी मा उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून दिल्यामुळे मा. उच्च न्यायालयाने मा.सर्वोच्च न्यायालयातील बीजनोर अर्बन को ऑप बैंक लि; बँकेच्या दाव्यातील आदेशाचे अवलोकन करुण ऐपत असणार्या व कर्जास मालमत्ता तारण दिलेली असणार्या कर्जदारास

# मराठा आरक्षण देता का जाता मराठ्यांचा सरकारवर हल्लाबोल




**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथे मराठा आरक्षणाच्या संदर्भात सकल मराठा समाजाच्या वतीने व शेतकरी बांधवांच्या वतीने आष्टी शहरांमध्ये महा ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये २०० ते २५० ट्रॅक्टर चालक व मराठा बांधवासह हजारो मराठा बांधव उपस्थित होते. मुंबई येथे २० जानेवारी रोजी मराठा आरक्षणासंदर्भात विराट महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर आष्टी येथे सकल मराठा समाजाच्यावतीने व शेतकरी बांधवांच्या वतीने महाट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मराठा बांधवांनी या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होत सरकारला मराठा आरक्षण देता की जाता इशारा दिला २० जानेवारीपर्यंत आरक्षण न दिल्यास आष्टी तालुक्यातून मोठ्या संख्येने ट्रॅक्टर व इतर वाहनांच्या बरोबर मराठा बांधव मोठ्या संख्येने मुंबईकडे आगे कूच करणार आहेत. त्यामुळे प्रशासनाने व शासनाने याची दखल घेत मराठा आरक्षणासंदर्भात तात्काळ निर्णय घ्यावा आष्टी तालुक्यातून हजारो मराठा युवक व शेतकरी मुंबई येथील महामोर्चासाठी उपस्थित राहणार असल्याचे सकल मराठा बांधवांच्या वतीने यावेळी सांगण्यात आले. आष्टी येथील विराट ट्रॅक्टर रॅली नगर रोडवरील मोरे मंगल कार्यालय लिमटाका चौक या ठिकाणी सुरू होऊन बेलगाव रोड, अहिल्यादेवी होळकर चौक ते व लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब चौक,छत्रपती संभाजी महाराज चौक, ,छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनी मंदिर,आष्टी कमान वेस,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चौक ते कमानवेस, महात्मा ज्योतिबा फुले चौक, महावीर चौक, छत्रपती व्यापारी संकुल आष्टी या ठिकाणी सर्व ट्रॅक्टर रॅली थांबवून या ठिकाणी समारोप करण्यात आला. २० जानेवारी रोजी मुंबईकडे जाण्याचे नियोजन सर्व उपस्थित सकल मराठा समाजाच्या विचाराने करण्यात आले.


# दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नविन इमारतीसाठी निधी मंजूर -आ.आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

पाटोदा येथिल दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नविन इमारत बांधण्यासाठी २ कोटी १२ लक्ष रूपयांचा निधी उपलब्ध झाल्याची माहिती आ. बाळासाहेब आजबे यांनी माध्यमांना दिली. आ. बाळासाहेब आजबे म्हणाले की आपण मतदारसंघातील सामान्य जनतेची कामे असणाऱ्या प्रशासकीय कार्यालय प्रशस्त व सर्व सोई युक्त होणे गरजेचे आहे त्यामुळे जास्तीत जास्त प्रशासकीय इमारती साठी निधी उपलब्ध होण्यासाठी उपमुख्यमंत्री



अजितदादा पवार कृषी मंत्री धनंजय मुंडे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला आहे. त्यामुळे आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातील अनेक कार्यालयांना नविन इमारतीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करून घेतला आहे, त्या उभ्या करण्यासाठी शासन दरबारी मोठे प्रयत्न केले असून त्यास यश ही आले आहे. आष्टी पाटोदा व शिरूर प्रशासकीय इमारतीसाठी मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाल्याने शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये ही आनंदाचे वातावरण आहे. आता पाटोदा येथिल दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नविन इमारत बांधण्यासाठी २ कोटी १२ लक्ष रूपयांचा निधी मंजुर झाला आहे. या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली असुन लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरूवात होणार आहे पाटोदा येथील या कार्यालयाचा प्रश्न अनेक दिवसापासून प्रलंबित होता अतिशय जुन्या व जीर्ण इमारतीमध्ये या कार्यालयाचा कारभार कसा बसा चालू होता येतील जनतेची अनेक दिवसांची मागणी लक्षात घेता आमदार बाळासाहेब आजबे यांनी प्रयत्न करून पाटोदा येथे भव्य अशा इमारतीसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पाटोदा तालुक्यातील जनतेच्या वतीने व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वतीने आमदार बाळासाहेब आजबे यांचे आभार मानण्यात येत आहेत.



बीड : मुकनायक पुरस्कारासाठी निर्भीड पत्रकार बीड येथील दै. मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे यांना जाहिर झाला. यावेळी त्यांचा मान्यवरांकडून सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# रस्ते कामांचा अन पाणीपुरवठा योजनेचा लोकार्पण शुभारंभ संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील.. हर घर जल.. घरोघरी नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणी ही संकल्पना.. अत्यंत गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदारपणे तयार झालेली टाकळसिंग येथील जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाली आहे याचा मनस्वी आनंद होत आहे..असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले. आष्टी तालुक्यातील टाकळसिंग – हनुमंतगाव ते शिराळ ५ कोटी ४३ लाख रु. किंमतीच्या रस्ता कामाचे भूमिपूजन आणि टाकळसिंग येथील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी



मिळावे यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत ४ कोटी ९१ लक्ष रु. किंमतीची पाणीपुरवठा योजनेचा लोकार्पण सोहळा आणि चिखलीकर जनतेची गेल्या अनेक दिवसापासून ची आग्रही मागणी असलेला राज्यमार्ग क्र.७० आष्टी–खडकत रोड चिखली फाटा ते चिखली या गावापर्यंतचा १ कोटी ६८ लक्ष रु.किंमतीचा असे एकूण १२ कोटी २ लक्ष रुपयांच्या विविध विकास रस्ता कामाचा भूमिपूजन समारंभ व लोकार्पण सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी टाकळसिंग येथील कार्यक्रमात व्यासपीठावर...जि.प.सदस्य अमर निंबाळकर, सभापती बद्रीनाथ जगताप,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय आजबे, ड.बाळासाहेब झांबरे,गौतम आजबे,माजी सभापती दत्तात्रय जेवे,उपकार्यकारी अभियंता दिलीप साळवी,हुले नाना,संजय लाटे, उपअभियंता सुनील कुलकर्णी हे उपस्थित होते. तर चिखली येथील कार्यक्रमात व्यासपीठावर जि.प.सदस्य अमर निंबाळकर, युवा नेते गणेश नाना शिंदे,

▶▶ पान २ वर

# भूमी अभिलेख कार्यालयाचा कारभार कर्मचाऱ्याविनाच

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्वच शासकीय कार्यालयात अधिकारी कर्मचारी यांची मनमानी चालू असून शासनाने पाच दिवसाचा आठवडा केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ०९:४५ ते संध्याकाळी स ०६:१५ केलेली असताना देखील भूमी अभिलेख कार्यालय माजलगाव येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी ११:०० वाजता एकही अधिकारी, कर्मचारी उपस्थित नव्हता कार्यालयात केवळ शिपाई डहाळे हजर होते. विशेष म्हणजे या कार्यालयातील सर्व कर्मचारी अधिकारी आपल्या सोयीनुसार,कधीही येतात व कधीही जातात.त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांची अनेक कामे खोळंबुन पडलेली असून अनेक शेतकरी बांधव भूमी अभिलेख कार्यालयाचा सकाळी दहा वाजल्यापासून उंबरा झिजवताना दिसून येत आहेत परंतु त्यांचे कुठलेही काम होत नसल्याने त्यांच्या गैरसोयी बाबत नेमकी कोठे तक्रार करावी याचीही माहिती अनेक शेतकऱ्यांना नसल्यामुळे भूमी अभिलेख कार्यालयाचा उंबरा झिजवल्या शिवाय त्यांच्यासमोर दुसरा कुठलाही पर्याय उपलब्ध नाही याचा गैरफायदा घेऊन भूमी अभिलेख कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकारी आपल्या नातेवाईकांना कार्यालयात वावर करण्यास मुभा देऊन त्यांच्या करवी वसुली करत असल्याची बाब समोर आली आहे,

▶▶ पान २ वर

# महाएल्गार मेळाव्याला मोठया संख्येने उपस्थित रहावे- प्रकाश कानगांवकर

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी बारा बलुतेदार, आठरा आलुतेदार, भटक्या विमुक्त, एसबीसी समाज बांधवांनी बीड येथे दि.१३ जानेवारी रोजी होणार्या महाएल्गार मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कानगांवकर यांनी केले आहे. बीड येथे १३ जानेवारी रोजी छत्रपती क्रीडा संकुल येथे मा.ना.छगनरावजी भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महाएल्गार मेळावा होणार असून यावेळी पालमंत्री मा.ना. मुंडे, माजी मंत्री पंकजाताई मुंडे, आ.गोपीचंद पडळकर, माजी मंत्री जयदत्तआण्णा क्षीरसागर, माजी मंत्री महादेव जानकर, माजी आ.नारायणराव मुंडे, प्रकाश अण्णा शेंडगे, मुस्लिम ओबीसी नेते शब्बीर अन्सारी, बारा बलुतेदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे, प्रा.टी.पी.मुंडे यांच्यासह ओबीसी समाजातील बहुसंख्य नेते पदाधिकारी व मान्यवरांची उपस्थिती रहाणार आहे. हा मेळावा भव्यदिव्य स्वरुपाचा व्हावा यासाठी ओबीसी बारा बलुतेदार, आठरा आलुतेदार, भटक्या विमुक्त, एसबीसी समाज बांधवांच्या प्रत्यक्ष गाठी–भेटी प्रकाशराव कानगावकर हे घेत आहेत. तरी या महाएल्गार मेळाव्यास समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

# आष्टी तालुका पत्रकार संघाचे तालुकाध्यक्षपदी पोकळे

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका पत्रकार संघाची नुकतीच बैठक जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे ,उत्तम बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. यावेळी सर्वानुमते तालुकाध्यक्षपदी प्रजापत्रचे वार्ताहर प्रविण पोकळे, उपाध्यक्षपदी लोकाशाचे वार्ताहर संतोष सानप तर सचिवपदी सांज राजयोगचे वार्ताहर शरद रेडेकर यांची निवड करण्यात आली.आष्टी तालुका पत्रकार संघाची आष्टी येथे दर्पण दिनानिमित्त दि.६ रोजी पत्रकार भवन येथे संपन्न झाली. या बैठकीत विविध विषयावर चर्चा करण्यात आली.ही बैठक जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे ,उत्तम बोडखे,मावळते अध्यक्ष प्रा.डा.ढोबळे ,रघूनाथ कर्डिले, भीमराव गुरव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रविण पोकळे, उपाध्यक्षपदी संतोष सानप,सचिवपदी शरद रेडेकर यांची निवड करण्यात आली.यावेळी संतोष सानप,शरद तळेकर,उत्तम बोडखे, प्रा.डा.विनोद ढोबळे यांची भाषणे झाली. नवनिर्वाचीत अध्यक्ष पोकळे म्हणाले की,पत्रकारितेतील माझे वय कमी असुन देखील माझी अध्यक्षपदावर निवड केल्याबद्दल मी सर्व जेष्ठ ,कनिष्ठ पत्रकार बांधवांचा मनापासुन आभारी आहे.विधायक वा समाजोपयोगी उपक्रम आपण राबवु असे यावेळी आश्वासन दिले.या बैठकीस शरद तळेकर,गणेश दळवी, सचिन रानडे,मनोज पोकळे यांच्यासह आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

# पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवीदारांच्या ठेविना विम्याचे संरक्षण देण्यासाठी विशेष प्रयत्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सहकारी संस्थां मोठया प्रमाणात आहेत.मात्र सध्या राज्याबरोबर जिल्ह्यात देखील सतत कुठली न कुठली बैंक, पतसंस्था तथा मल्टिस्टेट बुडित निघत आहेत. तेव्हा कुठेतरी बीड जिल्ह्यातील सहकारी संस्थाना घरघर लागल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ही लागलेली घरघर थांबवण्यासाठी व संस्था वाचवण्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सदर संस्था वाचवण्यासाठी अतोनात प्रयत्न करण्याचे आवाहन अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

सहकार चळवळीच्या माध्यमातून जिल्ह्यात अनेक सहकारी संस्थांची सुरुवात बीड जिल्ह्यात झाली आहे.मात्र सध्या जिल्ह्यातील सहकारी संस्थांना कुठेतरी दृष्ट लागली की काय असेही वातावरण निर्माण झाले आहे. त्याचे कारण संस्थांच्या संचालक मंडळाने केलेले दुर्लक्षच म्हणावे लागेल असेही राजकिशोर मोदी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. अनेक शाखांमध्ये ग्राहकांनी आपल्या पोटाला चिमटा काढून आपल्या कुटुंबाच्या उज्वल भवितव्यासाठी अतिशय विश्वासाने आपली जमापुंजी ठेवीच्या रूपाने ठेवलेली असते. या ठेवीचे रक्षण करणे हे त्या त्या संस्थेच्या सर्व संचालकांची जवाबदारी असते. ग्राहकांच्या विश्वासाला तडा जावु न देण्याचे काम संस्था चालकाचे असते. मात्र सध्या दिवसेदिवस कोणती न कोणती संस्था डबघाईला येऊन बुडीत निघालेली आढळून येत आहे. त्यामुळे राज्यातील आर्थिक सहकार चळवळीला घरघर लागून सहकारी संस्थावरील नागरिकांचा विश्वास कमी होताना दिसून येत आहे. तेव्हा आर्थिक सहकार चळवळ गतिमान व प्रगती पथावर ठेवणासाठी संस्थाचालक व त्यांच्या सर्व संचालकांनी सतत जागृत रहावे. तसेच संस्थाचालक व संचालकांनी मालक म्हणून काम न करता आपण संस्थेचे विश्वस्त आहोत अशीच भूमिका घ्यावी. मालक म्हणून जर आपले वर्तन राहिले तर संस्था अडचणीत येण्यास वेळ लागणार नसल्याचेही स्पस्ट मत अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी बोलतांना व्यक्त केले आहे. येणाऱ्या काळात महाराष्ट्र

▶▶ पान २ वर







▶▶ पान २ वर

